**श्रध्दांजली**

मित्र म्हणवणाऱ्या अनेकांनी,
वाहती ठेवली त्याची जखम...
काळजी होतीं, प्रेम होते,
एकंदर उद्दिष्टं चांगलंच होतं..
पण प्रत्येकाला तेच तेच सांगताना
अजून खोलवर जात होती त्याची वेदना
कुणालाच कसं जाणवलं नाही?
वाटून दुखः कमी होतं म्हणतात..
रडून मन हलकं होतं, असंही म्हणतात.
सांत्वनाचे दोन-चार शब्दं,
मलमासारखे चोपडले,
म्हणजे धरते का जखमेवर खपली?
मी तरी दुसरे काय केले?
कसाबसा धीर गोळा करून
परत खुपसली  माझीही बोटं..
त्याच्या त्याच जखमेत..
परत वाहत्या वेदनेची एक चिळकांडी..
आणि काही थेंब माझ्याही चेहऱ्यावर !
तो मात्र शांत वाटला..
सवयीचं झाल्यासारखं सगळं
अगदी तपशीलात बोलला..
काय, कसं, केंव्हा, आता, पुढे...
एक अर्धवर्तुळ हवेत काढत राहिला.
नियतीने अचानक केलेल्या आक्रमणावर..
शब्दांची माती सारत राहिला.
माझे मौन थकल्यावर,
त्याला एक घट्ट मिठी मारून...
काही बोलण्याचा  दुबळा प्रयत्न केला मी,
पण अशाने भरून येणारयातली पोकळी नाही ती..

उलट तोच माझ्या डोक्यावर थापटत
स्पर्शातून सांगत राहिला..
...........
हताश होणाऱ्यांपैकी नाहीच तो..
सगळं निभावून नेईल, नक्कीच!
अगदी नक्की !!!

**- प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com**